क्रमांक : १०५

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक ०६ जुलै, २०१७/ आषाढ १५, १९३८ शके

**१०६.** लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(**१**)महाराष्ट्र विधानसभेच्या सोमवार, दिनांक २४ जुलै, २०१७ रोजीपासून विधानभवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०१७ च्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनासाठी स्वीकारण्यात येणाऱ्या लक्षवेधी सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या निदेशानुसार **MOIS** या संगणक प्रणालीवर **संपूर्णत: online पध्दतीने सोमवार, दिनांक १७ जुलै, २०१७** रोजीपासून स्वीकारण्यात येतील.

(**२**)लक्षवेधी सूचना online पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने प्रथम दिवशी अवलंबविण्यात येत असलेली बॅलट पध्दत **कायमस्वरूपी** बंद करण्यात येत आहे.

(**३**)महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप जास्तीत जास्त १५० ते १७५ शब्दांचे असावे.

(**४**)अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण **३ दिवस** अगोदरचा दिवस हा सूचना स्वीकारण्यासाठी अंतिम दिवस असेल व सदर दिवशी कार्यालयीन वेळेत **सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत** सूचना स्वीकारण्यात येतील.

(**५**)लक्षवेधी सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेणेसंबंधीचा पूर्ण अधिकार हा मा. अध्यक्षांचाच राहील.

विधान भवन,
मुंबई,
**दिनांक : ०६ जुलै, २०१७.**

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत:-**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
(३) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) संगणक कक्ष (website)